P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक - ०१/०६/२०२३

# जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये व्यसनमुक्ति जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

मा. श्री. विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांचे संकल्पनेतुन “३१ मे जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त” पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दित सर्व पोलीस स्टेशन मधील वस्ती/झोपडपट्टी भागामध्ये महिला/गृहिणी समिती, बालकल्याण सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते/ प्रतिनिधी, पोलीस ठाणे स्तरावर नेमण्यात आलेले समन्वयक पोलीस अधिकारी पिंपरी चिंचवड यांचे मदतीने विशेष व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विशेष बाल पथकाचे नोडल अधिकारी डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली “३१ मे जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त” श्री. सतिश पवार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक यांनी अजमेरा कॉलनी येथे, विशेष बाल पोलीस पथक यांनी निगडी, चिंचवड पोलीस स्टेशनचे समन्वयाने अजंठानगर, आनंदनगर या झोपडपट्टी भागात व पिंपरी पोलीस स्टेशन येथे तसेच चाकण, रावेत, भोसरी, आळंदी, चिखली पोलीस स्टेशन इ. ठिकाणी वस्ती/झोपडपट्टी भागात समन्वयक पोलीस अधिकारी यांनी व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले. सदर व्यसनमुक्ति कार्यक्रमासाठी श्री, विल्यम साळवी, श्रीमती वंदना वाघमारे विमल फाउंडेशन, डॉ. राजीव नगरकर मानसोपचार तज्ञ, श्री. मंदार शिंदे, तेरे देस होमस्, श्री. परम आनंद, श्री. सचिन करंजुले होपस् फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन या सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधीनी अशा एकुण ११ ठिकाणी जागतिक तंबाखु दिनाचे महत्व सांगुन तंबाखु सेवनाचे मानवी जीवनावर होणारे दुष्परीणाम, व्यायाम व आहाराचे फायदे, बाल लैंगिक अत्याचार, बालकांची सुरक्षितता, शिक्षण व व्यसनाधिनता अशा प्रकारच्या वेगवेगळया विषयावर माहिती देवुन मार्गदर्शन केले. सदर जनजागृती कार्यक्रमामध्ये एकुण ३१२ बालकांनी, १६८ पालकांनी तसेच ०५ सामाजिक संस्थांचे एकुण १० प्रतिनिधी, एकुण २८ वस्ती/झोपडपट्टी समन्वयक व सामाजिक कार्यकर्ते, २६ महिला गृहीणी कमिटीमधील सदस्य, २७ पोलीस अधिकारी व अंमलदार असे एकुण ५७१ व्यक्तींनी सहभाग घेतला. उपस्थित सर्वांना “आपण सर्वजण राष्ट्राची संपत्ती असुन व्यसन करणार नाही” अशी शपथ देवुन प्रेरणा देण्यात आली. व बालकांचा उत्साह वाढविण्यात आला.

“जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त” व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे आयोजन मा. श्री. विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त सो, मा. श्री. संजय शिंदे,पोलीस सहआयुक्त सो, मा.स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप-आयुक्त सो (गुन्हे), विशेष बाल पथकाचे नोडल अधिकारी डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सतिश पवार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोशि/कपिलेश इगवे अंमली पदार्थ विरोधी पथक, तसेच विशेष बाल पथकाचे श्री. संपत निकम (श्रेणी पोलीस उप-निरीक्षक), मपोना/दिपाली शिर्के, पोशि/अमोल मुठे, पोशि/भुषण लोहरे, यांनी केले.

**(डॉ. विशाल हिरे )**
सहायक पोलीस आयुक्त
पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड